# मा.पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांचे हस्ते उल्लेखनिय कामगिरी करणा-या पोलीस अधिकारी व अंमलदार यांचा प्रशस्तीपत्र व बक्षिस देवून सत्कार.

१) **सांगवी पोस्टे गु.र.नं.६१३/२०२३ आर्म ॲक्ट ३(२५)** या गुन्हया तपासाचे अनुषंगाने संशयीत इसम नामे १) **हरीष काका भिंगारे** वय ३४ वर्षे धंदा- चालक रा. औंध रोड आंबेडकरनगर चंद्रमणी संघ पुणे २) **गणेश बाळासाहेब कोतवाल** वय ३० वर्षे धंदा- चालक रा. समर्थनगर नवी सांगवी ३) **शुभम जगन्नाथ पोखरकर** वय ३० वर्षे रा. स्टेट बँकनगर पंचवटी पाषाण पुणे ४) **अरविंद अशोक कांबळे** वय ४२ वर्षे धंदा- शेती रा. मु.पो.पौड ता. मुळशी जि.पुणे यांना ताब्यात घेवून त्यांचे ताब्यातून दोन पिस्टल व ५ राऊंड असे **एकूण २,०२,५००/-** रु किंमतीचे **४ पिस्टल व १० काडतूस** जप्त केले. **सदरची कामगिरी युनिट-२ कडील पोनि श्री.जितेंद्र कदम, पोउनि गणेश माने, पोलीस अंमलदार सपोफौज शिवानंद स्वामी, नामदेव कापसे, अतिष कुडके, अजित सानप, जमीर तांबोळी** यांनी केलेली आहे.

२) **सांगवी पोलीस स्टेशन येथे गु.र.नं-६३१/२०२३ भा.द.वि.कलम-३९२,३४** प्रमाणे दाखल गुन्हयामध्ये प्राप्त सी.सी.टी.व्ही फुटेजचे आधारे आरोपी १) **आनंद सुनिल साळुंखे उर्फ लोहार**, वय-१९ वर्षे, रा-खडकी स्मशानभुमी जवळ, रेल्वे पटरी समोर, महादेववाडी, खडकी, पुणे २)**अक्षय अशोक मुरकुटे**, वय-३१ वर्षे, रा- मुंजाबा वस्ती, धानोरी, पुणे ३)**धिरज गोपाळ गवळी**, वय-३१ वर्षे, रा- घर नंबर-४२७, गवळीवाडी, खडकी, पुणे यांना दाखल गुन्हयात निष्पन्न करुन चोरीचा माल विकत घेणारे सोनार १) **गणपत जवाहरलाल शर्मा,** वय-४४ वर्षे, धंदा-अभिषेक ज्वेलर्स रा-मांगल्य सोसायटी, एल्फिस्टन रोड, खडकी, पुणे, २) **दर्शन रमेश पारिख,** वय-३२ वर्षे, धंदा-रमेश ज्वेलर्स रा- ४०३, निताकॉर्नर, खडकी, पुणे, ३) सुरज भानसिद्धराम अग्रवाल, वय-७८ वर्षे, रा- गणेश ज्वेलर्स, खडकी, पुणे यांना ताब्यात घेवून त्यांचेकडून **एकुण-२५५ ग्रॅम वजनाचे सोन्याचेदागिने** जप्त करण्यात आले आहे. तसेच **इतर १३ जबरी चोरीचे** गुन्हे उघडकिस आणले. **सदरची कामगिरी युनिट-४ चे वपोनि श्री.संतोष पाटील,पो उप निरीक्षक गणेश रायकर, पोलीस अंमलदार मोहम्मद नदाफ, सुरेश जायभाये, धनाजी शिंदे, सुखदेव गावंडे** यांनी केलेली आहे.

३) **हिंजवडी पोलीस स्टेशन येथे गु.र.नंबर-१०७४/२०२३ भा.दं.वि.कलम-४२०,४०६,४६७, ४६८,४७१, १२०(ब), ३४ आय.टी.ॲक्ट ६६(ड) मध्ये ऑनलाईन फसवणूक करण्याचे उददेशाने** मोबाईल धारक यांना व्हॉटस्ॲप मेसेजव्दारे व टेलिग्राम आयडी वरुन गुगल मॅपवर वेगवेगळया हॉटेल्स व रेस्टॉरंट यांना रिव्हु व रेटींग देणेचा जॉब असल्याचे सांगून त्याअनुषंगाने वेगवेगळे टास्क देवून गुंतवणूकीतून संबंधीतांची फसवणूक करणा-या टोळीचा परराज्यातील इंदोर, रतलाम, भोपाळ, राजस्थान, जयपूर, उदयपूर, भिलवाडा, बरोडरा, पाटणा येथे माग घेवून टोळीतील **एकुण १४ आरोपींना** ताब्यात घेण्यात आले तसेच त्यांचेकडे केलेल्या अधिक तपासामध्ये १६ गुन्हे उघडकीस आणले आहेत. **सदरची कामगिरी युनिट ४ कडील वपोनि श्री. शंकर आवताडे, सपोनि श्री. अंबरिष देशमुख, पोलीस अंमलदार प्रविण दळे, मोहम्मद गौस नदाफ , वासुदेव मुंढे, प्रशांत सैद, सुखदेव गावंडे** यांनी केलेली आहे.

४) **महाळुंगे एमआयडीसी पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. ८००/२०२३, भा.द.वि.कलम ३०२,२०१** मधील मयत इसमाचे **हातावरील बंजारा अशा गोंदणवरुन** मयताची ओळख पटवून खूनाचे गुन्हयातील आरोपी १) **दशरथ ऊर्फ सोनू जयराम आडसुळ**,वय २१ वर्षे, रा. मु.कामठा, पोस्ट आपसिंगा, ता. तुळजापुर, जि. धाराशिव २) **विष्णु अंगद राऊत**, वय २९ वर्षे, रा. मु. पो. नालवंडी, ता. व जि. बीड यास बोईसर जि. पालघर ३) **बळीराम वसंत जमदाडे**, वय ३५ वर्षे, रा. मु.कामठा, पोस्ट हापसिंगा, ता. तुळजापुर, जि. धाराशिव यांना निष्पन्न करुन अटक करण्यात आली. **सदरची कामगिरी गुंडा विरोधी पथकाचे सहा.पो.निरी.एच.व्ही.माने, पोलीस अंमलदार पी.पी. तापकिर, जी.डी.चव्हाण, एस.डी.चौधरी, व्ही.टी. गंभिरे, एन.बी.गेंगजे** यांनी केलेली आहे.

५) **म्हाळूंगे एमआयडीसी पो.स्टे गु.र.नं.८६५/२०२३** भादवि कलम ४५४,३८० मधील अज्ञात आरोपी १) अमिर शब्बीर शेख, वय २५ वर्षे रा. से.नं.२५ निगडी प्राधिकरण , २) सोहेल शफीक पठाण, वय २३ वर्षे रा. खंडोबा मंदीर पायथा, निमगाव ता.खेड जि.पुणे यास निष्पन्न करुन त्यांचे ताब्यातून **१ किलो ७ तोळे वजनाचे सोन्याचे दागिणे** तसेच **रोख रक्कम** असा **एकुण ४५,३३,४००/- माल मुददेमाल** हस्तगत करण्यात आला. त्याचप्रमाणे म्हाळूंगे, चाकण ,तळेगांव, तळेगांव एमआयडीसी, भोसरी एमआयडीसी येथे दाखल असलेले **एकुण १८ गुन्हे उघडकीस** आणले आहेत. सदरची कामगिरी **म्हाळुंगे पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी वपोनि श्री. वसंत बाबर,पोउनि विलास मच्छिंद्र गोसावी, पोलीस अंमलदार संतोष काळे, किशोर सांगळे, संतोष वायकर, शिवाजी लोखंडे, अमोल माटे** यांनी केलेली आहे.

**वरील उल्लेखनिय कामगिरी बद्दल मा.श्री.विनय कुमार चौबे, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांनी गुन्हे आढावा बैठकीमध्ये अशाच प्रकारे भविष्यात देखील असेच उत्कृष्ट कामगिरी कराल याबाबत वरील नमुद अधिकारी व अंमलदार यांना प्रशस्तीपत्र व बक्षिस देवून गौरविण्यात आलेले आहे.**